## नि. ०५ खालील आदेश

( दि. ०५/०२/२०२२ )

अर्जदार हिने प्रस्तुत अर्ज गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी मिळण्याकरीता केलेला आहे.

**२.** तिचे कथन थोडक्यात असे आहे की, तिचे लग्न गैरअर्जदार क्र. १ सोबत दि. ०७/०५/२०१९ रोजी झाले. लग्नात मानपान केला नाही म्हणुन गैरअर्जदार नं. १ ते ३ हे अर्जदारास हिणवीत असत व तुझ्या माहेराहुन वस्तु, बुलेट व पैसे घेवून ये म्हणुन त्रास देत असत व शिवीगाळ करत असत व अर्जदार हिच्या माहेरच्या लोकांचा देखील अपमान करीत असत. गैरअर्जदार नं.१ हे अर्जदारास शारिरीक सुख देण्यास असमर्थ होते. याची तक्रार अर्जदार यांनी गैरअर्जदार नं. ३ यांना केली असता त्यांनी सांगितले की, त्याच्यात शारिरीक समस्या व कमतरता आहे त्यामुळे तो लाजाळू आहे. गैरअर्जदार नं. १ ते ३ यांनी ही बाब अर्जदार व त्यांच्या घरच्यापासून लपवून त्यांना फसवून लग्न केलेले आहे. गैरअर्जदार नं. १ हे अर्जदार हिच्या मानसिक व शारिरीक छळ करुन तू इथून निघुन जा असे म्हणुन तिला जीवे मारण्याचा धमक्या देत असे. दि. २८/०९/२०१९ रोजी गैरअर्जदार क्र. १ यांनी गैरअर्जदार क्र. ३ यांच्या म्हणण्यावरुन अर्जदार हिला मारहाण केली. तसेच दोघांनी तिला शिवीगाळ व दमदाटी केली. तसेच गळा आवळण्याचा प्रयत्न केला. सदर छळामुळे अर्जदार हिने तिच्या हाताची नस कापून घेतली. त्यामुळे तिला दवाखान्यात दाखल करावे लागले. तिथे देखील गैरअर्जदारांनी तिला धमकी दिली. त्यानंतर अर्जदार हिला तिचे आई–वडील माहेरी घेवून गेले व त्यानंतर गैरअर्जदारांनी तिला नांदविण्यास नकार दिला.

**३.** अर्जदार हिच्या आई–वडीलांची परिस्थिती ही बेताची आहे. गैरअर्जदार नं. १ ते ३ यांची आर्थिक परिस्थिती ही चांगली असून त्यांना शेतीतून, व्यापारातुन व नोकरीतून चांगले उत्पन्न मिळते. म्हणुन प्रस्तुत अर्ज तिने गैरअर्जदाराकडून दरमहा पोटगी मिळण्यासाठी व त्यांनी मालमत्ता विकू नये या ताकिदीसाठी केला आहे.

**४.** गैरअर्जदाराने सदर अर्जास व मुख्य अर्जास समान खुलासा नि. ०९ अन्वये दाखल केला व अर्जदार हिच्या सोबत त्याचे झालेले लग्न झाल्याचे त्याने मान्य केले. परंतु अर्जदार हिचे सर्व आरोप नाकारले. त्याने खुलास्यात स्पष्टपणे कथन केले की, लग्नानंतर अर्जदार हिस गैरअर्जदार यांनी चागंली वागणूक दिली व कधीही मानसिक व शारिरीक त्रास दिलेला नाही. घरात कामाला व्यक्ती असल्याने अर्जदार हिस कोणतेही काम करावे लागत नव्हते. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार क्रं. १ पासून वेगळी राहत असे व कधीही त्याच्याशी शारिरीक संबध ठेवले नाही. गैरअर्जदार नं. १ मध्ये कोणतीही शारिरीक कमतरता नाही उलट अर्जदार हि लग्नापुर्वी अपंग होती ही बाब गैरअर्जदार यांच्याकडून तिच्या घरच्यांनी लपवून ठेवली. अर्जदार हिला नांदायचे नसल्यामुळे व गैरअर्जदार यांना मुद्दाम त्रास देण्यासाठी तिने खोटा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार ही घर सोडतेवळेस स्त्रीधन घेवून गेली आहे. गैरअर्जदार नं. १ हे शेती करत असून अर्जदार ही नर्स असून कमवती आहे त्यामुळे ती गैरअर्जदार यांच्यावर अवलंबून नाही. अर्जदार हीने गैरअर्जदार यांचा त्याग करुन स्वतःच्या मनमर्जीनुसार माहेरी राहत आहे. गैरअर्जदार हे अर्जदार हिस नांदविण्यास घेवून जाण्यास तयार आहेत. अशाप्रकारे अर्जदार हिचा अर्ज रद्द करण्याची मागणी गैरअर्जदारांनी केली.

**५.** मी दोन्ही पक्षांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला व त्यांनी त्यांच्या मालमत्ता व दायित्वांचे शपथपत्र दाखल केले. अर्जदार हिने तिच्या मुख्य अर्जात विविध आरोप गैरअर्जदारांविरुध्द केले आहे. अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहते ही बाब गैरअर्जदारांनी देखील मान्य केली आहे. त्यांचे कथन असे आहे की, ती स्वतःच्या मर्जीने तिच्या माहेरी राहत आहे. परंतु, ती असे कश्यामुळे करत आहे याचे कुठलेही समाधानकारक स्पष्टीकरण गैरअर्जदारांनी त्यांच्या जबाबात नमूद केलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांच्या त्रासामुळे अर्जदार हि तिच्या माहेरी राहत आहे असे प्रथमदर्शनी तिच्या कथनावरुन दिसून येते.

**६.** अर्जदार हिच्या पालनपोषणाची कुठलीही सोय गैरअर्जदाराने केली हे त्याच्या जबाबात नमूद नाही. अर्जदार हिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही असे अर्जदार हिने कथन केले आहे. तिच्या सदर कथनाला तिचे मालमत्ता व दायित्वांच्या शपथपत्रावरुन परिपुष्टी मिळते. ती नर्सचे काम करते असे जरी गैरअर्जदाराने कथन केले असले तरीही त्याबद्दल कुठलेही कागदपत्र त्यांनी दाखल केले नाही. याउलट गैरअर्जदार याने त्याच्या जबाबात मान्य केले आहे की, तो शेती करतो. त्यामुळे त्यातुन त्याला उत्पन्न मिळते ही बाब स्पष्ट आहे.

**७.** अर्जदार हिला उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे ती अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदार हिच्या पालनपोषणाची जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ ची आहे. त्यामुळे अर्जदार हिच्या गरजा लक्षात घेता, तसेच सध्या जिवनावश्यक वस्तुंच्या किमती लक्षात घेता व गैरअर्जदार क्र. १ चे उत्पन्न लक्षात घेता अर्जदार हिचा अंतरिम पोटगीचा अर्ज अशतः मंजूर

होण्यास पात्र आहे. अर्जदार हिने सदर अर्जात केलेली दुसरी मागणी सध्या मान्य करता येण्यासारखी नाही कारण गैरअर्जदार हे त्यांची मालमत्ता विकण्याच्या तयारीत आहे असे अर्जदार दाखवू शकलेली नाही. याशिवाय येथे हे देखील नमूद करणे महत्वाचे आहे की, सदर अर्ज कोवीड–१९ सारख्या महामारीत दाखल झाला आहे. सदर महामारी व त्याअनुषंगाने वेळोवेळी झालेल्या लॉकडाउन मुळे सर्वांनाच आर्थिक अडचणींना तोंड दयावे लागत आहे. या कारणास्तव सदर आदेशाची अंमलबजावणी अर्ज दाखल तारखेपासून न करता आदेशापासून करावी असा निर्णय घेण्यात येत आहे. वरील कारणमिमांसेच्या आधारावर मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. गैरअर्जदार क्र. १ हयाने अर्जदार हिला अंतरिम खावटीपोटी दरमहा ₹ ३,०००/– आदेशाच्या तारखेपासून सदर अर्जाचा अंतिम निर्णय होईपर्यंत दयावे.

२. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षांना विनामुल्य देण्यात यावी. तसेच एक प्रत संबंधीत पोलीस स्टेशन व सेवा पुरवठा करणारे यांना पाठविण्यात यावी.

३. अर्जदार हिने सदर अर्जात केलेल्या इतर मागण्या या अंतिम निर्णयाच्या वेळेस विचारात घेतल्या जातील.

दिनांकः– ०५/०२/२०२२

(सौ. आर. डी. पतंगे–इंगळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खेड – राजगुरुनगर

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी. डी. एफ. फाईलमधील मजकूर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | — | आर.व्ही.बेलदार |
| न्यायालयाचे नाव | — | आर. डि. पतंगे—इंगळे<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर राजगुरुनगर—खेड व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग राजगुरुनगर—खेड |
| दिनांक | — | ०५/०२/२०२२ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केलेला दिनांक | — | ११/०२/२०२२ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | — | ११/०२/२०२२ |